# GONDWANA UNIVERSITY, GADCHIROLI

(Established by Government ofMaharashtra Notification No. MISC -2007/(322/07) UNI -4Dated27th Sept. 2011 & Presently a State University governed by Maharashtra Public University Act, 2016 (Maharashtra Act No. VI of 2017)

## National Service Scheme

Dr. Naresh M. Madavi
Director(I/c.)
Mo. No. - 8888282463

MIDC Road, Complex, GADCHIROLI – 442 605 (M.S)
web: www.unigug.org
Email : nssdsw.gug@ gmail.com


पत्र क्र. No.GU/NSS/ 1118 /2020 Dt : 11/11/2020

प्रति,

मा. प्राचार्य / रासेयो कार्यक्रम अधिकारी,
संलग्नीत रासेयो महाविद्यालये,
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

**विषय:— 'अभिरूप युवा संसद' व 'युवा भूषण या' कार्यक्रमात सहभागी होण्याबाबत.**

**संदर्भ:**— युवा बिरादरी यांचा दिनांक २६/१०/२०२०चा ई—मेल.

महोदय / महोदया,

उपरोक्त संदर्भांकीत विषयान्वये युवक बिरादरी संस्थेव्दारे **अभिरूप युवा संसद' व 'युवा भूषण'** या कार्यक्रमात सहभागी होण्याचे आवाहन केले आहे करीता संलग्न पत्रात दिलेल्या निर्देशान्वये सदर कार्याक्रमात सहभागी व्हावे, ही विनंती.

धन्यवाद!

डॉ. नरेश मडावी
संचालक (प्र.)
राष्ट्रीय सेवा योजना
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

संलग्न पत्र:— युवा बिरादरी (भारत) यांचे पत्र.

Since 9 August 1974

# Yuvak Biradari (Bharat)

Hazarimal Somani Marg, Near V.T. (CSMT), Mumbai 400001, India.
Phone: +91 22 22075592 or 22076212 Email: info@biradari.org Website: www.biradari.org

*President - Abhishek Bachchan, Vice-Presidents - Riteish Deshmukh & Ravindra Dharia, Chairman - Shrirang Sarda,*
Vice Chairman - Sunil Rohokale, Managing Trustee - Swar Kranti, Director General - Ashutosh Shirke
Trustees: Jaya Bachchan, Dr. Narendra Jadhav, Ashutosh Gowariker, Rohini Hattangady, Kranti Shah (Founder)

दि. २५ ऑक्टोबर, २०२०

प्रति,

**कुलगुरू**

**गोंडवाना विद्यापीठ,**
गडचिरोली
vc@gondwana.digitaluniversity.ac, gug.registrar@gmail.com

**विषय : राज्य शासनाच्या सौजन्याने आयोजित 'अभिरूप युवा संसद' व 'युवा भूषण' उपक्रमात विभागीय सहयोगी भूमिकेत व आपल्या संलग्न संस्थांना सहभागासाठी आवाहन करावे यासाठी प्रस्ताव.**

प्रिय महोदय,

उद्याच्या भारताचे अग्रदूत ठरावेत, स्वत:च्या परिवाराचे व समाजाचे खऱ्या अर्थाने सारथी बनावेत व सर्वात मोठ्या युवा जगतात तरुणाईला दिशादर्शक ठरणाऱ्या 'सक्रीय युवक' घडणीत आपणही प्रोत्साहनरूपी संस्थात्मक मंच द्यावा यासाठी सदर पत्र देत आहोत.

सन १९७४पासून विविध क्षेत्रांत कार्यरत युवक बिरादरी (भारत) द्वारा शैक्षणिक व स्पर्धात्मक माध्यमात तरुणाईला सकारात्मकतेसाठी एकत्र आणायचे आहे. त्यासंदर्भात देशभरात एकाच वेळी किमान १०० नगरांत व ५० जिल्ह्यांच्या अंतर्गत 'अभिरूप युवा संसद' व त्यास पूरक 'युवा भूषण' उपक्रमाची योजना हाती घेत आहोत. स्पर्धेच्या व गर्दीच्या जगात सक्षम व्यक्तिमत्त्वासाठी अपेक्षित व्यवहारज्ञान, कार्यकुशलता, सचोटी, आर्थिक साक्षरता, शारीरिक क्षमता, आपल्या विषयाचे ज्ञान वाढवण्यासाठी सातत्याने इच्छाशक्ती, कार्यावर निष्ठा, आदी गुण यशस्वी व्यक्तिमत्त्वाला आवश्यक ठरणार आहेत. तसेच लोकशाही मूल्ये, सर्वसमावेशकता व संसदीय पद्धतीचा आचार वाढावा यासाठी वाद-संवाद, दृष्टिकोन, दूरगामी विचार, निर्णयक्षमता, आदींसाठी जाण असणारी पिढी ही काळाची गरज आहे.

त्या प्रयत्नाचा एक भाग म्हणून १) आपली संस्था दि. ५ डिसेंबर २०२० या दिवशी साधारण ७५ विद्यार्थ्यांना कार्यक्रमात सहभागाची संधी देत 'ऑनलाईन' स्वरूपात आयोजित स्पर्धेचे केंद्र म्हणून स्वीकृती देईल व २) पाच टप्प्यातील सोबतच्या योजनेप्रमाणे आयोजित उपक्रमात चार ते पाच गुणी युवजनांना 'अभिरूप युवा संसदे'च्या विभागीय कार्यशाळेत प्रशिक्षणाची संधी देत आपल्या महाविद्यालयात अभिरूप युवा संसदेचे आयोजन करावे व गुणवत्तेत उत्तम ठरल्यास विभागीय स्पर्धेसाठी प्रोत्साहित करावे.

या संदर्भात दि. १० नोव्हेंबर पूर्वी info@biradari.org किंवा vsharad69@gmail.com या ई-मेलवर सोबतच्या नमून्यात उत्तर पाठवावे, ही अपेक्षा. दि. १९ नोव्हेंबरपूर्व www.biradari.org या संकेतस्थळावर आम्हास उपक्रमाचा तपशील, कार्यक्रम आयोजनाची केंद्रे, नोंदणीविषयी माहिती प्रसारित करता येईल.

शुभकामनांसह धन्यवाद,

**स्वर क्रांती / सुनील वालावलकर**
प्रोजेक्ट संचालक, युवक बिरादरी (भारत)

संलग्न : कार्यक्रमाची योजना

**Regional Workshop Schedule of Abhirup Yuva Sansad:**

| No. | Participating Districts | Stage 3 – Regional Workshops Venue, Schedule | Stage 4 - Regional Competition Venue, Schedule |
|---|---|---|---|
| 1 | A. Nagpur, Bhandara, Gondia. | Nagpur: 20 December 9.30am - 1.00pm. | Nagpur: 4 January 9.30am - 1.00pm |
| | B. Gadchiroli, Chandrapur, Wardha. | Chandrapur: 20 December 1.00pm - 6.00pm | Nagpur: 4 January 1.00pm - 6.00pm |
| 2 | A. Amravati, Yavatmal. | Amravati: 21 December 9.30am - 1.00pm | Amravati: 5 January 9.30am - 12.00 noon |
| | B. Akola, Buldhana, Washim. | Akola: 21 December 1.00pm - 6.00pm | Amravati: 5 January 1.00pm-6.00pm |
| 3 | Parbhani, Hingoli, Latur, Nanded. | Latur: 22 December 9.30am - 6.00pm | Aurangabad: 6 January 9.30am - 6.00pm |
| 4 | Osmanabad, Beed, Jalna, Aurangabad. | Aurangabad: 23 December 9.30am - 6.00pm | Aurangabad: 7 January 9.30am-6.00pm |
| 5 | A. Greater Mumbai, Palghar. | Mumbai: 20 December 9.30am - 1.00pm | Mumbai: 4 January 9.30am-1.00pm |
| | B. Thane, Raigad. | Mumbai: 20 December 1.00pm - 6.00pm | Mumbai: 4 January 1.00pm-6.00pm |
| 6 | Nashik, Dhule, Jalgaon, Nandurbar. | Nashik: 21 December 9.30am - 6.00pm | Nashik: 5 January 9.30am-6.00pm |
| 7 | Pune, Satara, Solapur, Ahmednagar. | Pune: 22 December 9.30am - 6.00pm | Pune: 6 January 9.30am-6.00pm |

# युवक बिरादरी (भारत) सहयोगी संस्थांसह
# अभिरूप युवा संसद
# स्पर्धात्मक व प्रशिक्षणात्मक अभियान
## (दि. ५ डिसेंबर २०२० ते १२ जानेवारी २०२१)

दोन शब्द : भारतातील संसदीय प्रणालीचे मंदिर म्हणजे लोकसभा - राज्यसभेकडे आपण पाहतो. तसेच जगातील ज्या ज्या देशांत संसदीय प्रणाली आहे, त्या देशांचा विचार करताना जनतेच्या अपेक्षांना मूर्तरूप देणारी व्यवस्था संसदीय प्रणालीत आपण शोधतो.

त्या संसदीय प्रणालीत जवळजवळ ३६ राज्ये व केंद्रशासित प्रदेश, साधारणत: ६३९ जिल्हे तसेच ग्रामपंचायती, छोटी गावे, तालुका पंचायती, जिल्हा पंचायती / परिषदा, ६,५०,००० खेडी, छोट्या नगरांच्या यंत्रणा, नगरपालिका ते महापालिका व देशभर पसरलेल्या अशासकीय संस्था आज परिवर्तनाची अपेक्षा ठेवून आहेत. स्वच्छ, सुंदर, पारदर्शक, होतकरू, स्वप्नांना कृतीत आणणाऱ्या, चौफेर ज्ञानासाठी सदैव विद्यार्थी राहणाऱ्या नव्या तरुणाईच्या स्वागतास देश उत्सुक आहे. त्या तरुणाईला मार्गदर्शन करण्यासाठी, मंच देण्यासाठी 'अभिरूप युवा संसद - युवा भूषण' या उपक्रमाचा राज्य व राष्ट्र स्तरावरचा युवक बिरादरी (भारत)चा प्रामाणिक प्रयत्न आहे.

१) अभिरूप युवा संसद उपक्रमाच्या संदर्भात व्यक्तित्व-नेतृत्वाच्या मार्गावर युवजनांच्या विकासाचा विचार करण्यात आला आहे. सक्षम नेतृत्वासाठी चौफेर ज्ञानाची भूक व भारतीय संविधानावरील श्रद्धा या गुणांचा बोध घेत तरुणाईने अभिरूप युवा संसदेत प्रवेश करावा, ही अपेक्षा आहे.

नियोजन :

पहिल्या टप्प्यात दि. ५ डिसेंबर २०२० रोजी सकाळी १०.०० वाजता युवक बिरादरी (भारत) द्वारा दिल्या जाणाऱ्या लिंकवर इच्छुक युवजनांना वैयक्तिक किंवा संस्थेच्या सहयोगाने नोंदणी करता येईल. सकाळी ११.०० ते दुपारी १.०० या कालावधीत एक तासाच्या वेळमर्यादेत 'ऑनलाईन' १५० गुणांसाठी ७५ बहुपर्यायी चाचणी (ॲप्टीट्यूट टेस्ट) द्यावी लागेल. सदर ॲप्टीट्यूट टेस्टमध्ये किमान ७५ गुण प्राप्त करणारे दुसऱ्या टप्प्यात गुणवत्ताधारक म्हणून सहभागी होतील. पहिल्या टप्प्याबरोबर किंवा दुसऱ्या टप्प्यात मूल्यांकनाद्वारा 'संविधानातील सरनामा' व 'शाश्वत सर्वसमावेशक विकास' या विषयांवर व्यक्तिगत दृष्टिकोनाचे मूल्यमापन करण्यात येईल.

दुसऱ्या टप्प्यात दि. १२ व १३ डिसेंबर रोजी गुणवत्ताधारक ठरणाऱ्या स्पर्धकांना ऑनलाईन व्यक्तिगत गुणांचा परिचय द्यावा लागेल. ॲप्टीट्यूट टेस्टचे १५० गुण धरून मूल्यांकनाकरिता ५० गुण, व्यक्तिगत मुलाखत २५ गुण व विषयाची मांडणी (वकृत्व-संवाद गुण) यासाठी २५ गुण मिळून २५० गुणांपैकी १५० गुण प्राप्त करणारे गुणवत्ताधारक ठरतील व त्यांना 'गुणवत्ताधारक' म्हणून गौरव-प्रमाणपत्रे दिली जातील. तसेच नियोजित अभिरूप युवा संसद उपक्रमात सहभागासाठी सदर स्पर्धेतील सहभागी युवजनांचे स्वागत असेल. तसेच गुणवत्ताधारक प्रत्येक जिल्ह्यातील व महानगरांतील केंद्रातील प्रथम व द्वितीय युवजनांना प्रत्येकी रुपये २,००० व अन्य तीन युवजनांना प्रत्येकी रुपये १,००० प्रोत्साहन स्वरूपात दिले जातील. गुणवत्ताधारकांना त्यांच्या गुणविकासासाठी जानेवारी ते मे २०२१ या कालावधीत प्रत्येक महिन्यात दोन वेळा याप्रमाणे एकूण आठ सत्रांत विविध क्षेत्रातील नामवंतांद्वारे ऑनलाईन नि:शुल्क मार्गदर्शन केले जाईल.

तिसऱ्या टप्प्यात दि. २० ते २३ डिसेंबरच्या कालावधीत महाराष्ट्राच्या आठ विभागात व दहा राज्यांत वेळापत्रकाप्रमाणे इच्छुक संस्था अभिरूप युवा संसद उपक्रमात नोंदणी करतील. नोंदणीकृत समुहातील प्रातिनिधिक पाच युवा सदस्यांना आमंत्रित करून अभिरूप युवा संसदेच्या संदर्भात पूर्वतयारी कशी करायची व संहिता, दिग्दर्शन, सादरीकरण आदींबाबत मार्गदर्शन केले जाईल. सदर उपक्रम हा 'ऑफलाईन' (प्रत्यक्ष) केला जाईल.

आठ विभागीय केंद्रांवर निमंत्रित युवजनांना सकाळी ९.३०पर्यंत पोहोचावे लागेल. स्नेहभोजन, जलपान व पाच व्यक्तींच्या टीमला पॅकेजमध्ये टोकन प्रवास-साहाय्य दिले जातील. अर्थात, कोविड-१९मुळे प्रत्यक्ष कार्यक्रमात अडचण आल्यास सदर टप्प्यातील उपक्रम 'ऑनलाईन' घेण्यात येईल. त्यासोबत सर्व समूहांना व्हिडिओद्वारा सादरीकरणासाठी मार्गदर्शन करण्यात येईल. तसेच सदर कार्यशाळेत व प्रत्यक्ष चाचणीद्वारा पहिल्या दोन स्पर्धात्मक उपक्रमात सहभागी युवजनांच्या गुणांचा विचार करत प्रत्येक जिल्ह्यातून किमान एका समूहाची विभागीय स्पर्धेसाठी निवड करण्यात येईल. विभागीय स्पर्धेसाठी संहिता, दिग्दर्शन, सादरीकरण, वेशभूषा आदींबाबत सहभागी समूह निर्णय घेतील.

चौथ्या टप्प्यात राज्याच्या सर्व महसूली विभागांचा अंतर्भाव करीत दि. ३ जानेवारी ते ७ जानेवारी २०२१ या कालावधीत वेळापत्रकात दिल्याप्रमाणे नियोजित केंद्रांत विभागीय स्पर्धेचे आयोजन होईल. विभागीय स्पर्धेत नियोजित दिवशी सकाळी ९.३० वाजेपर्यंत दाखल व्हायचे आहे. ६० मिनिटांच्या कालावधीत अभिरूप युवा संसदेचे सादरीकरण करायचे आहे. विभागीय स्पर्धेत गुणवत्तेच्या आधारावर सर्वोत्कृष्ट समूहास धनादेशाद्वारा १० हजार रुपयांचा पुरस्कार व गुणवत्तेच्या आधारावर प्रत्येकी पाच-पाच हजारांचे पुरस्कार दिले जाणार आहेत. व्यक्तिगत संसदपटूंची नोंद प्रत्येक विभागात घेतली जाणार आहे. आमंत्रित समूहांना जलपान व भोजन व्यवस्था दिली जाणार आहे. निवासव्यवस्था असणार नाही. विभागीय कार्यशाळा व विभागीय स्पर्धेचे ठिकाण ई-मेलने निवड केलेल्या संस्थेस तीन दिवसपूर्व कळविले जाणार आहे.

पाचव्या टप्प्यात विभागीय स्पर्धेतून सर्वश्रेष्ठ ठरणाऱ्या समूहांना दि. ११ व १२ जानेवारी २०२१ रोजी मुंबईत आमंत्रित केले जाणार आहे. मुंबईमध्ये आमंत्रित केल्या जाणाऱ्या विभागीय समूहांना पॅकेजमध्ये प्रवासखर्च, प्रवासातील आहार व गरज लागल्यास निवास आदी व्यवस्थेसाठी आर्थिक साहाय्य दिले जाणार आहे. अंतिम स्पर्धेतील सर्वोत्कृष्ट समूहास रुपये ५० हजार, द्वितीय समूहास ३० हजार व तृतीय समूहास २० हजार रुपयांचे पुरस्कार दिले जाणार आहेत. सर्व स्पर्धकांना विशेष गौरव प्रमाणपत्रे दिली जाणार आहेत.

२) अपेक्षित विधेयकांचे विषय : १) भ्रष्टाचार मुक्त प्रशासन २) २०४७ नंतर देश आरक्षणमुक्त असेल ३) वसुंधरा संरक्षणासाठी नवी राष्ट्रीय नीती ४) किसान सुरक्षेसाठी कृषिविषयक नवीन धोरण ५) अभिव्यक्ति स्वातंत्र्याच्या संदर्भात नवीन नीती ६) सामाजिक ऐक्यविषयक राष्ट्रीय नीती ७) कोरोनानंतर शैक्षणिक धोरण ८) जन्माने समानता ९) दोन अपत्ये हा आचार आणि १०) सुशिक्षित बेकारांसाठी स्वयंपूर्ण बनण्यासाठी नवीन योजना.

३) अभिरूप युवा संसदेतील उद्दिष्टांबाबत निकष
ए) या स्पर्धेत १) संसदीय पद्धतीचा आचार २) लोकतांत्रिक मूल्य ३) विचारातील दृष्टिकोन ४) दूरगामी विचार ५) निर्णयक्षमता ६) समस्येचे निराकरण करण्यासंदर्भात भूमिका आणि ७) वकृत्व शैली, वाद-संवाद या सप्तगुणांच्या निकषावर प्रामुख्याने राज्यभाषा (मराठी), राष्ट्रभाषा व मर्यादित इंग्रजी माध्यमात कार्यक्रमाचे सादरीकरण असेल.

४) स्पर्धेचे स्वरूप
* अभिरूप युवा संसदेसाठी एकूण २० व्यक्तींचा संघ * सत्तारूढ पक्षाचे ८ व विरोधी पक्षाचे ७ सदस्य * सभापती, सभापतींना साहाय्यक सेवक, संसदीय सचिव, मार्शल व चोपदार * अभिरूप युवा संसदेची रचना अर्धवर्तुळाकार * सभापतींचे आसन उंचावर * सभापतींसमोर संसदीय सचिव * सभापतींच्या पाठीमागे साहाय्यक * सभापतींच्या उजव्या बाजूस सत्ताधारी पक्ष व डाव्या बाजूस विरोधी पक्ष * सभागृहात शांतता व सुव्यवस्थेसाठी मार्शल * सत्तारूढ - विरोधी पक्षांच्या खुर्च्यांसमोर टेबल व ऑडिओ सिस्टमची व्यवस्था * प्रत्येकी दोन रांगांत सत्तारूढ व विरोधी पक्ष * राज्यभाषा व राष्ट्रभाषा व अपवादात्मक इंग्रजी भाषांचा वापर * युवा संसदेचा कालावधी ६० मिनिटांपर्यंत * सभापतींचे आगमन होताच जन-गण-मन या राष्ट्रगानाने सभागृहाचे कामकाज * पहिल्या १५ मिनिटांत प्रश्नोत्तराचा कालावधी * प्रश्न व उपप्रश्न मांडण्यामागील भूमिका * सत्ताधारी पक्षातील मंत्र्यांकडून योग्य त्या उत्तराची अपेक्षा * दुसऱ्या भागात पंतप्रधानांद्वारे / मंत्र्यांद्वारे शासकीय वा कोणत्याही खासदाराकडून अशासकीय विधेयक * सदर विधेयक देशाच्या भवितव्याशी निगडित वा घटनेत दुरुस्ती करणारे

* विधेयकावर दोन्ही बाजूंनी किमान तीन-तीन सदस्य चर्चेत भाग घेतील * विधेयकाचा कालावधी ४५ मिनिटेपर्यंत * शेवटी सभापतींचा विधेयकावर निर्णय व सभागृह पुढील काळापर्यंत तहकूब करतील.

५) सहभागासाठी : १) प्रश्नोत्तराच्या संदर्भात संस्थांना विषयांचे स्वातंत्र्य असेल. सादरीकरणाच्या वेळी (१) परीक्षण, (२) डॉक्युमेंटेशन, (३) आर्थिक व्यवहार व (४) प्रमाणपत्रासाठी सहभागी युवक-युवतींची नावे, त्यांच्याद्वारे सादर होणारी व्यक्तिरेखा (रोल), संपर्क क्रमांक, ई-मेल, जन्मतिथी या माहितींच्या चार प्रती देणे अनिवार्य आहे. निवास व्यवस्थेची सोय केली जाणार नाही. २) सादरीकरण हे लिखित वा स्वयंस्फूर्त स्वरूपात असू शकेल, ज्याला पूरक सेट अप (नेपथ्य) / साऊंड / लाईट यांची व्यवस्था केली जाईल. ३) परीक्षक समिती सर्व स्तरांवरील स्पर्धेचा निर्णय घेतील. सादरीकरणावेळी अशोभनीय व्यवहार व असंसदीय संभाषण असू नये. मर्यादांचे उल्लंघन करणाऱ्या समूहाचा प्रवेश रद्द करण्याचा अधिकार आयोजकांना असेल. ४) स्पर्धापात्र युवक १६ ते २५ या वयोगटातील असावेत. ओळखपत्र आवश्यक आहे. ५) कार्यशाळा व स्पर्धेवेळी शिस्त, पावित्र्य राखण्यासाठी केवळ आमंत्रित समूहांतील २१ व्यक्ती व दोन सहाय्यक सहयोगींनाच प्रवेश असेल. ६) स्पर्धेच्या संदर्भात अंतिम अधिकार स्पर्धाआयोजक वा युवक बिरादरी (भारत)कडे सुरक्षित असतील. स्पर्धेच्या नियमांच्या संदर्भात कुणालाही आव्हान देता येणार नाही. अभिरूप युवा संसद उपक्रमात प्रवेशासाठी शैक्षणिक संस्था / नोंदणीकृत युवा संस्था / नेहरू युवा सेंटर / राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक / राष्ट्रीय छात्र सेना अधिकारी किंवा जिल्हा क्रिडा अधिकाऱ्यांद्वारा प्रत्यक्ष वा शिफारशीने भाग घेता येईल. पहिल्या टप्प्यात व्यक्तिगतही भाग घेता येईल. ७) प्रवेशअर्जात आर्थिक व्यवहार, पुरस्कार, साहाय्य आदींबाबत व्यवहाराशी निगडित व्यक्तीचा स्पष्ट उल्लेख आवश्यक आहे, तसेच समूह प्रमुखाच्या नावाने आर्थिक व्यवहार करायचा असेल संस्थेने आपल्या निवेदनात तसा स्पष्ट उल्लेख करायचा आहे किंवा समूहातील बहुसंख्य स्पर्धकांनी धनादेश कुणाला द्यावेत याबद्दल मान्यता देणे आवश्यक आहे. ८) ऑनलाईन व ऑफलाईन स्वरूपाबाबत, कार्यक्रम स्थळाबाबत व अनपेक्षित बदल असल्यास युवक बिरादरी (भारत)च्या संकेतस्थळावर माहिती दिली जाईल.

६) माहिती व नोंदणी - सदर उपक्रमासंदर्भात दि. १९ नोव्हेंबर २०२० नंतर www.biradari.org या वेबसाईटवर सविस्तर माहिती प्राप्त होऊ शकेल, तसेच सहभागासाठी नावनोंदणी करता येईल. तसेच आवश्यक असल्यास अधिक माहितीसाठी संस्थेच्या info@biradari.org ई-मेलवर किंवा शरद विचारे - ९८२१५०३१६१ किंवा ९३२११२७०७१ यांच्याशी संपर्क साधता येईल.

पत्ता - युवक बिरादरी (भारत) हजारीमल सोमानी मार्ग, फोर्ट, मुंबई - ४०० ००१. दूरध्वनी ०२२ २२०७५५९२

**Prescribed Format – Letter of Support (on institute's letterhead or with institute seal/stamp):**

Date: ......

To,
Founder / Director General / Regional Coordinator
Yuvak Biradari (Bharat)
Hazarimal Somani Marg, CST, Mumbai - 400 001.
Email: info@biradari.org

Subject: Our support to Yuvak Biradari's Abhirup Yuva Sansad and Yuva Bhushan 2020-21 in response to your letter dated 25 October 2020

Sir,

1) We welcome the initiatives Abhirup Yuva Sansad and Yuva Bhushan. We will endeavour to create a student team to present a Mock Youth Parliament to develop democratic values and understanding of the Parliamentary system. We will provide an opportunity to four selected meritorious student-youth along with a Faculty Member who would wish to be the Coordinator to participate in the Regional Workshop organised by Yuvak Biradari. The contact details of this Faculty Coordinator are mentioned below.
2) For the all-round development of our youth we will endeavour to have at least 75 of our student-youth participate in the online aptitude test and values assessment on 5 December 2020.

Our details are as follows:
Head of the Institution:
Name: ............................................................ Designation:...............................
Email: ............................................................Mobile number:...........................

Faculty Coordinator for this programme:
Name: ............................................................ Designation:...............................
Email: ............................................................Mobile number:...........................

Yours sincerely,

Head of the Institution
Name, Designation
Stamp